# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३१२३**
**व**
**रामाआ तक्रार क्र. बीएम-६८१/२०२४**

**अपिलार्थी श्रीम. विजू बी चव्हाण**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी -१**
उपनिबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, मुंबई यांचे कार्यालय, रुम नं ३०३,
तिसरा मजला, ए विंग, बी एम सी गोडाऊन बिल्डिंग, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ,
ठाकूर कॉम्प्लेक्स, ९० फुट रोड, कांदिवली (पू), मुंबई- ४०० १०१

**प्रथम अपिलीय अधिकारी**
उपनिबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, मुंबई यांचे कार्यालय, रुम नं ३०३,
तिसरा मजला, ए विंग, बी एम सी गोडाऊन बिल्डिंग, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ,
ठाकूर कॉम्प्लेक्स, ९० फुट रोड, कांदिवली (पू), मुंबई- ४०० १०१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०१.२०२५</u>**

अपीलकर्ता/तक्रारकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ११.०७.२०२४ | - | २०.०८.२०२४ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १८.१०.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये एकाच समान विषयासंदर्भात द्वितीय अपील व तक्रार अर्ज दाखल केले आहेत.

अपिलार्थींनी त्यांचा माहिती अर्ज दिनांक ११.०७.२०२४ अन्वये त्यांच्या दिनांक १२.०५.२०२१ रोजीच्या तक्रार अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांचेकडून उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित कालावधीत सुनावणी आदेश पारीत केले नाहीत म्हणून त्यांनी आयोगाकडे एकाच दिवशी (दि.१८.१०.२०२४) द्वितीय अपील व तक्रार अर्ज सादर केले. सदर तक्रार आयोगाच्या कार्यालयात तक्रार क्रमांक बीएम-६८१/२०२४ या क्रमांकावर नोंदविण्यात आली. सदर द्वितीय अपील व तक्रार अर्जावर एकत्रितपणे सुनावणी घेण्यात आली.

अपील/तक्रार अर्जावर झालेल्या सुनावणीस अपिलार्थी/ तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

..२/-

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दिनांक २७.०१.२०२५ आयोगास सादर केले. त्यांनी आयोगास नमूद केले की, त्यांनी ०१ ऑगष्ट २०२४ चे पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती अर्जाचे उत्तर दिले होते. त्यांनी तक्रारकर्त्यांना कळविले होते की, त्यांनी मागणी केलेली धारिका कार्यालयात उपलब्ध असून धारिकेतील आवश्यक प्रती कार्यालयातून उपलब्ध करुन घ्याव्यात. तसेच प्रथम अपील अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. १९.०९.२०२४ रोजी अपील अंशत: मान्य करुन तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती तक्रारकर्त्यांना १५ दिवसात पुरविण्यात यावी, असे आदेशीत केले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर दि.२४.०९.२०२४ चे पत्रान्वये त्यांनी पान क्रमांक १ ते १४ जोडून माहिती पाठविण्यात आली आहे.

अपिलार्थी/तक्रारकत्यांनी आयोगास सादर केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांचे दि.०१.०८.२०२४ व दि.२४.०९.२०२४ चे पत्र तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि.१९.०९.२०२४ अप्राप्त आहेत.

या प्रकरणात उपलब्ध कागदपत्रं आणि अपिलार्थी/तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर असे निदर्शनांस येते की, अपिलार्थी यांनी एकाच विषयाशी संबंधित माहिती अर्जास अनुसरुन अधिनियमाच्या कलम १९(३) प्रमाणे द्वितीय अपील व कलम १८ प्रमाणे तक्रार अर्ज अशा दुहेरी प्रक्रीयेचा (Dual Procedure) एकाच वेळी अवलंब केला आहे. वास्तविकत: माहिती अर्ज व प्रथम अपील प्रक्रीयेनंतर विहित कार्यपध्दतीनुसार फक्त अपील प्रक्रीया ग्राह्य ठरते तर त्याच समान विषयावर थेटपणे तक्रार दाखल करणे योग्य ठरत नाही.

तथापि, जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दिनांक ०१.०८.२०२४ व २४.०९.२०२४ सहपत्रांसह तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि. १९.०९.२०२४ आदेश अपिलार्थींना यापूर्वी पाठविले असल्याबाबत जावक नोंदवहीची प्रतीसह अपिलार्थींना सदर आदेश प्राप्तीचे १५ दिवसात रजिस्टर पोस्टाने पुन्हा पाठवावीत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१. जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनाप्रमाणे कार्यवाही करावी.**
**२. अपील क्रमांक ३१२३/२०२४ व तक्रार क्रमांक ६८१/२०२४ निकाली काढण्यात येत आहेत.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ३०.०१.२०२५**

प्रदीप व्यास 30-1-2025
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**